**पोलीस कोठडीतील मृत्यू (Custodial Death) प्रकरणांच्या तपासाबाबत मार्गदर्शक नियमावली तसेच पोलीस कोठडीतील मृत्यू (Custodial Death) होऊ नये याकरिता घ्यावयाची दक्षता...**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र.पोकोमृ-०७२६/प्र.क्र.९६/पोल-१४**
**२ रा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.**
**दिनांक:- २८.०७.२०२६**

**संदर्भ:-**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय यांचे पत्र क्र. ३२/३४-पोकोमृ/८८ मुंबई, दि.१०/०५/१९८९.

२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग परिपत्रक क्रमांक एन.यु.आर.०७१०/सी.आर. १५८/पोल-११, दि.२२/११/१९९०.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय यांचे आदेश क्र. टी.आर.जी./ एन.एच.आर.सी./ जनरल/ १९९९/२०, डिसेंबर १९९९.

४) महाराष्ट्र राज्य मानव हक्क आयोग यांचे परिपत्रक क्र.एसएचआरसी ०३/२००२ मुंबई, दि.११/३/२००२.

५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय यांचे, परिपत्रक क्र.पोमसं/४२-अ/मा.ह.आ./ परिपत्रक/ २००४/१०२, दि.२७/०१/२००४.

६) महाराष्ट्र शासन, गृह विभाग पत्र क्र. पीसीडी-२०११/प्र.क्र.३/पोल-१४, दि. २८.०६.२०११

७) अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे परिपत्रक क्र. अपोमसं/ गु.अ.वि./ वाचक/परिपत्रक/पोकोमृ/उपाययोजना/१०१/२०१२,दि. २३/०४/२०१२.

८) महाराष्ट्र शासन, गृह विभाग परिपत्रक क्र.सी.आर.टी.- ०६१४/६८४/प्र.क्र.०२/पोल-१४ मुंबई, दि. १२/११/२०१४.

९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय यांचे, परिपत्रक क्र.पोमसं/४२-अ/एनएचआरसी/पोकोमृ व्याख्या /०१(२८४)/२०१६, दि.१४/१२/२०१६.

१०) राष्ट्रीय मानव हक्क आयोग यांचे पत्र क्र.एफ.नं.४-०/२०१६/डी.आय.जी.- एनएचआरसी, दि.२१/११/२०१६.

११) महाराष्ट्र शासन, गृह विभाग परिपत्रक क्र.सी.आर.टी-०६१४/६८४/प्र.क्र.०२/पोल-१४, दि.१०/१/२०१७.

१२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग परिपत्रक क्र.सी.आर.टी.- ०६१४/६८४/प्र.क्र.०२/पोल-१४, दि.२०/०२/२०१८.

१३) सहसचिव, भारत सरकार, गृहमंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १५०११/६६२०२० HR-I&II, दि.१३/०७/२०२०.

१४) अपर पोलीस महासंचालक राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे परिपत्रक ६५/२०२०, दि. ०९/०९/२०२० व ५९/२०२१ दि. २८/१०/२०२१.

१५) महाराष्ट्र शासन, गृह विभाग परिपत्रक क्र.न्यायाप्र-०८२५/प्र.क्र.१०२/पोल-१४, दि. ३० सप्टेंबर २०२५.

१६) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग चार-क, क्र.बीएनएनएस/०३२५/सी.आर.३४/स्पेशल-९, दि.२८.११.२०२५- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) २०२३, महाराष्ट्र राज्य ई साक्ष व्यवस्थापन नियम, २०२५

१७) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ क्र.पीआरओ-०६२४/प्र.क्र.३१/विशा-२,दि. १०/०२/२०२६ - भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३

१८) अपर पोलीस महासंचालक राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे पत्र जा.क्र.अपोमसं/गुअवि/PCD/०९/२०२६, दि १२/०२/२०२६.

१९) अपर पोलीस महासंचालक राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे परिपत्रक जा.क्र.गुअवि./संगणक /५१९/२०२६, दि. २२/०५/२०२६

**प्रस्तावना :-**

पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालय, केंद्र शासन, राज्य शासन, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, राज्य मानव अधिकार आयोग, पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य तसेच अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेकडून वेळोवेळी शासन अधिसूचना/शासन निर्णय/परिपत्रक/निर्देश निर्गमित करण्यात आले आहेत. पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणांमध्ये उपरोक्त सर्व शासन अधिसूचना/शासन निर्णय/परिपत्रक/निर्देश व देशात लागू झालेल्या न्याय संहिता (BNS, BNSS, BSA) यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होणेकरिता उपरोक्त संदर्भाचे एकत्रीकरण करून खालीलप्रमाणे सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणी तपासाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे तसेच पोलीस कोठडीतील मृत्यू होऊ नयेत याकरिता घ्यावयाची दक्षता याबाबत सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## <u>भाग १ - पोलीस कोठडीतील मृत्यूच्या तपासाबावत मार्गदर्शक सूचना</u>

### १. "पोलीस कोठडीतील मृत्यू" याची व्याख्या :-

राष्ट्रीय मानव अधिकार आयोग यांचेकडील परिपत्रक क्र. F.No.4-0/2016/DIG/NHRC Dated २१.११.२०१६ प्रमाणे पोलीस कोठडीतील मृत्यू व न्यायालयीन कोठडीतील मृत्यूची व्याख्या खालीलप्रमाणे आहे. :-

"Death in police custody" means death of a person when he is in the 'formal custody' of the police or under 'constructive custody' of the police (means in physical custody of the police though accused may not be formally arrested, such as a person detained for interrogation without being arrested) then death of such person will amount to "death in police custody". Thus, in cases wherein a person died while in formal custody or in constructive custody of police, then such cases will fall under the category of "death in police custody".

"Judicial Custody" represents a case wherein the custody of a person has been remanded to Prison Authority by a Judicial Magistrate. During his detention in prison (i.e. judicial custody), if a person dies because of any reason whatsoever, then it will amount to Death in Judicial Custody. It also includes cases where the inmate is medically ill or has died during treatment in hospital. In case where armed police escort from local police or district police is provided to jail officials to take the inmate to hospital, still the inmate is deemed to be in Judicial Custody and for death of such inmate the responsibility of intimating the NHRC will fall on the "Jail Authorities" and not on the local police. The police guard or the hospital authorities in such cases will have responsibility for safety, security and well being of the prisoner but the prisoner will continue to remain in the Judicial Custody during that period. The

responsibility to intimate the NHRC, therefore, lies on the Jail authorities, if a person dies in Judicial Custody.

यानुसार ज्या प्रकरणांमध्ये एखाद्या व्यक्तीचा मृत्यू पोलिसांच्या किंवा इतर कोणत्याही तपास यंत्रणांच्या औपचारिक ताब्यात (Formal Custody) किंवा रचनात्मक ताब्यात (Constructive Custody) असताना झाला असेल, अशी प्रकरणे "पोलीस कोठडीतील मृत्यू" (Death in Police Custody) या श्रेणीत मोडतील.

**२. तपास कोणी करावा :-**

पोलीस कोठडीतील/ताब्यात असलेल्या आरोपीस मृत्यू आला तर असे प्रकरण बृहन्मुंबईशी निगडीत असल्यास गुन्हे शाखा, मुंबई यांनी तर बृहन्मुंबई वगळून इतर घटकात गुन्हे अन्वेषण विभाग यांनी तपास करावा.

**३. पोलीस कोठडीतील मृत्यू झाल्यानंतर घटनास्थळ संरक्षित करणे व त्या अनुषंगाने आकस्मिक मृत्यू (A.D.) नोंदवणे व त्या अनुषंगाने पूढील कार्यवाही करणे** :-

**३.१ पोलीस कोठडी / घटनास्थळ (Scene of Occurance (SoO)) तात्काळ संरक्षित करणे व उक्त पोलीस कोठडीतील मृत्यूची आकस्मिक मृत्यू (A.D.) म्हणून नोंद करणे :-**

पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याची माहिती मिळताच, संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तथा घटक प्रमुख यांनी संबंधित कोठडी / घटनास्थळ (Scene of Occurance (SoO)) संरक्षित करावे, जेणेकरुन उपलब्ध पूरावा नष्ट होणार नाही किंवा त्याची छेडछाड होणार नाही. पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी मृतदेहाची ओळख पटवून विनाविलंब उक्त पोलीस कोठडीतील मृत्यूची आकस्मिक मृत्यू (A.D.) म्हणून CCTNS कार्यप्रणालीत नोंद करण्याची दक्षता घ्यावी. तसेच पोलीस ठाणे प्रभारी यांनी पोलीस कोठडी, पोलीस ठाणे व घटनास्थळ येथील CCTV फुटेज संरक्षित (Secure and untampered) करावे.

**३.२ संबंधिताना माहिती देणे :-**

पोलीस कोठडीत मृत्यू झाल्यास संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी याबाबतची माहिती तात्काळ जिल्हा दंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी, गुन्हे शाखा, मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे नियंत्रण कक्ष, संबंधित घटकाचे नियंत्रण कक्ष, तसेच पोलीस महासंचालक कार्यालय नियंत्रण कक्ष येथे कळवावी.

जिल्हा दंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी यांनी स्वतः किंवा BNSS, २०२३ चे कलम १९४ (४) अन्वये अधिकार असलेल्या त्यांच्या अधिपत्याखालील कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्यास मरणान्वेषण (Inquest) पंचनामा करण्याकरिता तात्काळ रवाना करावे.

गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधिक्षकांनी तात्काळ तपासी अधिकारी यांची नेमणूक करावी व तपासी अधिकाऱ्याने उक्त पोलीस कोठडी मृत्यूचा तपास स्वतः कडे घ्यावा. तसेच गुन्हे शाखेचे पोलीस सह आयुक्त / गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधिक्षक यांनी देखील घटनास्थळास भेट द्यावी.

**३.३ विविध विभाग/यंत्रणांना माहिती कळविणे :-**

पोलीस कोठडी मृत्यू बाबतची माहिती संबधीत घटक प्रमुख यांनी २४ तासांच्या आत राष्ट्रीय मानव अधिकार आयोग (NHRC), राज्य मानव अधिकार आयोग (SHRC) व अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विहित नमुन्यामध्ये कळवावी.

**३.४ कार्यकारी दंडाधिकारी यांनी करावयाचा मरणान्वेषण (Inquest) पंचनामा :-**

जिल्हा दंडाधिकारी/ उपविभागीय दंडाधिकारी यांनी उक्त प्रमाणे नेमलेल्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याने NHRC यांनी वेळोवळी निर्गमित केलेल्या सुचनांच्या अधिन राहून मृतदेहाचा विनाविलंब मरणान्वेषण (Inquest) पंचनामा करावा. तसे करत असताना मृतदेहाचे बहुकोनीय चित्रीकरणही करावे. मरणान्वेषण (Inquest) पंचनामा करतेवेळी मयताचे नातेवाईकांना सहभागी करुन घ्यावे. मयत महिला असल्यास महिला पंच घ्यावे.

मरणान्वेषण (Inquest) पंचनामा संपताच कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना करावा.

मरणान्वेषण (Inquest) पंचनामा व व्हिडीओ चित्रीकरण हे कार्यकारी दंडाधिकारी यांनी गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासी अधिकाऱ्याकडे सोपवावे. सदरील तपासी अधिकारी यांनी बहुकोनीय चित्रीकरण स्विकारताना भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम ६३ ची कार्यप्रणाली अवलंबवावी.

**३.५ घटनास्थळ (Scene of Occurrence (SoO)) ची फॉरेन्सिक टीमकडून तपासणी व पंचनामा :-**

गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाचे तपासी अधिकारी यांनी पोलीस कोठडीतील मृत्यूचा तपास स्वतः कडे घेताच घटनास्थळी (Scene of Occurrence (SoO) फॉरेन्सिक टिमला न्यायसहाय्यक पूरावा (Forensic Evidence) गोळा करण्यासाठी पाचारण करावे. घटनास्थळाची बारकाईने तपासणी करून फॉरेन्सिक टिमच्या मदतीने तपासी अधिकारी यांनी घटनास्थळावरील न्यायसहाय्यक पूरावे गोळा करावे. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचा पंचनामा eSakshya व नियमित पद्धतीने करावा.

तसेच फॉरेन्सिक टिमच्या मदतीने तपासी अधिकाऱ्याने घटनास्थळाचे रिकन्स्ट्रक्शन (Crime Scene Reconstruction) करावे व त्याचा अभिलेख बनवावा.

**३.६ घटनास्थळ (Scene of Occurrence (SoO)) येथील CCTV फुटेज, डिजीटल पूरावा इत्यादी :-**

गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाचे तपासी अधिकारी यांनी पोलीस कोठडी, घटनास्थळ (Scene of Occurrence - SoO) व इतर CCTV फुटेज व डिजिटल पूरावा इत्यादी भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम ६३ प्रमाणे जप्त करावे.

**४. न्यायदंडाधिकारी चौकशी :-**

बीएनएसएस २०२३ चे कलम १९६(२) अन्वये सदरील पोलीस कोठडी मृत्यूची Magisterial Inquiry होण्यासाठी गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाचे तपासी अधिकारी यांनी संबंधित न्यायदंडाधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करावा. सदरील पत्राची एक प्रत मुख्य न्यायदंडाधिकारी तसेच जिल्हा व सत्र न्यायाधिश यांना अग्रेषित करावी. गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाचे तपासी अधिकारी यांनी पाठपूरावा करून सदर चौकशी अहवाल (Magisterial Inquiry Report) प्राप्त करून घ्यावा व त्यातील निष्कर्ष लक्षात घेऊन अंतिम अहवाल सादर करण्याबाबत निर्णय घ्यावा.

## ५. पोस्टमार्टम आणि वैज्ञानिक पूराव्याचे संकलन :-

### ५.१ पोस्ट मार्टम :-

सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या मेडिकल सेंटर्सपैकी, जवळच्या मेडिकल सेंटर येथे प्रेताचे पोस्ट मार्टम करण्यास पाठविण्याची विनंती, गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाचे तपासी अधिकारी यांनी इन्क्वेस्ट पंचनामा करणाऱ्या कार्यकारी दंडाधिकारी यांना करावी.

| अ.क्र. | शासकीय वैदयकीय न्यायवैदयक शास्त्र विभाग महाविदयालय | संबंधित सेवा घेणारे जिल्हे व त्या जिल्ह्यांतर्गत येणारे सर्व पोलीस ठाणे व त्या जिल्ह्यांतर्गत येणारी कारागृह |
|---|---|---|
| १. | ग्रँट वैदयकीय महाविदयालय, जे.जे. रुग्णालय समुह, मुंबई | बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे रायगड, पालघर |
| २. | बी.जे.मेडीकल महाविदयालय व ससून रुग्णालय, पुणे | पुणे,अहिल्यानगर |
| ३. | शासकीय वैदयकीय महाविदयालय, मिरज | सांगली, सातारा |
| ४. | राजा छत्रपती शाहु महाराज शासकीय वैदयकीय महाविदयालय, कोल्हापूर | कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| ५. | डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैदयकीय महाविदयालय, सोलापूर | सालापूर |
| ६. | शासकीय वैदयकीय महाविदयालय, लातुर | धाराशिव, लातुर |
| ७. | स्वामी रामानंदतीर्थ ग्रामीण शासकीय वैदयकीय महाविदयालय, आंबेजोगई | बीड |
| ८. | शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, जालना |
| ९. | डॉ.शं.च.शासकीय वैदयकीय महाविदयालय, नांदेड | नांदेड, परभणी, हिंगोली |
| १०. | कै. भाऊसाहेब हिरे शासकीय वैदयकीय महाविदयालय, धुळे | नाशिक, धुळे, नंदुरबार |
| ११. | शासकीय वैदयकीय महाविदयालय, जळगाव | जळगाव |
| १२. | शासकीय वैदयकीय महाविदयालय, अकोला | अकोला, अमरावती, बुलढाणा |
| १३. | कै.वसंतराव नाईक शासकीय वैदयकीय महाविदयालय, यवतमाळ | यवतमाळ, वाशिम |
| १४. | शासकीय वैदयकीय महाविदयालय, चंद्रपूर | चंद्रपूर, गडचिरोली |
| १५. | शासकीय वैदयकीय महाविदयालय, गोदिया | गोंदिया |
| १६. | इंदिरा गांधी शासकीय वैदयकीय महाविदयालय, नागपूर | भंडारा, वर्धा |
| १७. | शासकीय वैदयकीय महाविदयालय, नागपूर | नागपूर |

**५.२ वैद्यकीय तज्ञांचे पॅनेल :-**

शवविच्छेदन किमान तीन किंवा त्यापेक्षा अधिक तज्ञ वैद्यकीय अधिका-यांच्या पॅनेल कडूनच करून घ्यावे. मयत महिला असल्यास एक वैद्यकिय अधिकारी महिला असावी.

संपूर्ण पोस्टमार्टमचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे अनिवार्य आहे. व्हिडिओमध्ये अंतर्गत अवयवांचे विच्छेदन आणि तपासणीचे दृश्य स्पष्ट असावे.

**५.३ जैविक व रासायनिक नमुने जतन करणे :-**

पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणात वैद्यकिय अधिकारी यांनी राष्ट्रीय मानव अधिकार आयोग (NHRC) यांच्या दि. २७/०३/१९९७ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार शवविच्छेदन करणे बंधनकारक असून Model Autopsy Form नुसार आवश्यक जैविक, रासायनिक व इतर नमुने जतन करून ते तपासी अधिकारी यांच्या ताब्यात द्यावेत.

तसेच गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाचे तपासी अधिकारी यांनी सदर नमुने संबंधित न्यायवैद्यकिय प्रयोगशाळा यांचेकडे पुढील परिक्षणासाठी पाठवावेत.

**५.४ वैद्यकीय विसंगतीचा खुलासा :-**

मरणान्वेषण (Inquest) पंचनामा आणि पोस्टमार्टम रिपोर्टमधील जखमांच्या नोंदींमध्ये किंवा मृत्युच्या वेळेबाबत विसंगती आढळल्यास, संबंधित कार्यकारी दंडाधिकारी व डॉक्टरांशी चर्चा करून त्यांचा लेखी अभिप्राय घ्यावा. गळफास घेतल्याचे प्रकरण असल्यास, ती विशिष्ट लिगेचर (दोरी/कापड) वापरून आत्महत्या करणे शक्य आहे का, याबाबत रासायनिक विश्लेषकांचा (C.A.) व डॉक्टरांचा स्पष्ट तांत्रिक अभिप्राय घ्यावा.

**६. दस्तऐवज व व तांत्रिक पुरावा गोळा करणे व त्या अनुषंगाने तपास करणे :-**

**६.१ मूळ अभिलेख जप्त करणे :-**

ज्या गुन्ह्यात किंवा कारणासाठी आरोपीला अटक/ताब्यात घेण्यात आले होते, त्यासंबंधीचे मूळ दस्तऐवज (उदा. अटक पंचनामा, स्टेशन डायरी/ठाणे दैनंदिनी, लॉकअप रजिस्टर, वॉर्डन/गार्ड ड्युटी रजिस्टर, वाहन लॉगबुक, बिनतारी संदेश नोंदवही इत्यादी) गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाचे तपासी अधिकाऱ्याने तात्काळ जप्त करून अभिलेखावर घ्यावे. मूळ कागदपत्रे जप्त करणे शक्य नसल्यास, सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह प्रमाणित प्रती घ्याव्यात.

ज्या ठिकाणी मयताला मरणापूर्वी अटक केले होते तेथील साक्षीदार तसेच अटक पंचनाम्यातील पंच यांचेकडे गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासी अधिकारी यांनी सखोल तपास करावा.

घटनास्थळाचे /पोलीस ठाणे येथील जप्त केलेल्या CCTV फुटेज / DVR हे न्यायवैद्यक विभाग (FSL) यांचेकडे पाठवावेत व पुढील तपासाकरीता त्याची मिरर इमेज प्राप्त करावी.

**६.२ साक्षीदारांचे जवाब नोंदवणे :-**

अटकेच्या वेळेपासून ते मृत्यूच्या वेळेपर्यंत पोलीस ठाण्यात उपस्थित असलेल्या किंवा आलेल्या सर्व अभ्यागतांचे (Visitors), अर्जदारांचे, फिर्यादींचे तसेच लॉकअपमध्ये मृत व्यक्तीसोवत असलेले इतर आरोपी यांचे सविस्तर व वस्तुनिष्ठ जबाब नोंदविणे आवश्यक आहे.

पोलीस तपासादरम्यान साक्षीदार तपासणीच्या अनुषंगाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १८० चे पोट-कलम (३) नुसार दोन महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश आहे.

१. साक्षीदारांनी दिलेले जबाब पोलीस अधिकारी लेखी स्वरूपात नोंदवू शकतो व अशा साक्षीदाराचा जबाब स्वतंत्र, यथातथ्य व अचूकपणे नोंदवणे आवश्यक आहे. यासोबत सदरचे जबाब पोलीस अधिकारी हे दृकश्राव्य (ऑडिओ-व्हिडिओ) इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे देखील नोंदवू शकतो.

२. जर साक्षीदार महिला असेल आणि ती विशिष्ट गंभीर गुन्ह्यांचा बळी असेल (उदा. लैंगिक छळ, बलात्कार, ॲसिड हल्ला इत्यादी ) तर तिचा जबाब महिला पोलीस अधिकाऱ्याने किंवा महिला अधिका-याने नोंदवणे बंधनकारक आहे.

सर्व पोलीस घटक प्रमुखांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व तपासी अधिकारी यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १८० चे पोट-कलम (३) मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करणेबाबत योग्य मार्गदर्शन करुन तपासावर उचित पर्यवेक्षण करावे.

**६.३ तांत्रिक पूरावा (CDR/SDR) :-**

पोलीस कोठडी मृत्यूमध्ये आरोपीस मारहाण, छळ इत्यादी गोष्टी संबंधित पोलीस ठाणे अधिकारी /अंमलदार यांचेकडून झाल्याचा संशय असल्यास अथवा त्यांचा थेट सहभाग असल्यास संबंधित अधिकारी/ अंमलदार यांचे मोबाईल SDR (Subscriber Detail Record), CDR (Call Detail Record) आणि डम्प डेटा (Dump Data) व टॉवर लोकेशन काढून घटनास्थळावरील व कोठडीजवळील त्यांची उपस्थिती तांत्रिकदृष्ट्या निश्चित करावी.

**७. तपास :-**

**७.१** गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासादरम्यान दखलपात्र गुन्हा घडल्याचे निदर्शनास आल्यास विहित कार्यपध्दती अवलंबून तपासी अधिकारी यांनी संबंधित पोलीस ठाण्यात प्रथम खबर नोंदवावी व सदरील गुन्ह्याचा पुढील तपास इतर अधिकाऱ्याकडे सोपविण्यासाठी गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागास विनंती करावी.

**७.२** पोलीस कोठडी मृत्यूसंदर्भात बीएनएसएस २०२३ चे कलम १९४ (१) (पूर्वीचे सीआरपीसी १७४(१)) अन्वये गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासी अधिकाऱ्याला कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडे अंतिम अहवाल (Closure Report) दाखल करावयाचे असल्यास न्यायदंडाधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालाचा निष्कर्ष लक्षात घ्यावा.

**७.३** गुन्हे शाखा / गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासी अधिकाऱ्यास पोलीस कोठडीतील मृत्यूच्या तपासामध्ये काही विभागीय बाबी निदर्शनास आल्यास विहित कार्यपध्दती अवलंबून पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करावे.

## भाग २ :- पोलीस कोठडीत मृत्यू होऊ नये याकरीता घ्यावयाची दक्षता

### १. अटक करण्यापूर्वी व नागरिकांकडून सोपवलेल्या आरोपीवावत विशेष दक्षता (BNSS २०२३ नुसार)

### १.१ अटकेपूर्वीची वैद्यकीय तपासणी :- (Mandatory Medical Examination- Sec 53, BNSS 2023)

बीएनएसएस २०२३ चे कलम ५३ नुसार अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीची वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तात्काळ वैद्यकीय तपासणी करणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे. जर संशयित आरोपीला अटक करण्यापूर्वीच काही जखमा असतील किंवा तो आजारी असेल, तर त्याला अधिकृतपणे अटक दाखवण्यापूर्वी शासकीय रुग्णालयात नेऊन त्याची सविस्तर वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. त्या जखमांचे स्वरूप आणि ती जुनी आहे की नवीन, याचा उल्लेख वैद्यकीय प्रमाणपत्रात स्पष्टपणे नोंदवून घ्यावा, जेणेकरून नंतर पोलिसांवर मारहाणीचा खोटा आळ येणार नाही.

### १.२ नागरिकांनी मारहाण केलेले आरोपी :-

अनेकदा चोरी, पाकिटमारी किंवा इतर गुन्ह्यांमध्ये सार्वजनिक ठिकाणी नागरिकांच्या बेदम मारहाणीमुळे (Mob Lynching or Public Assault) आरोपींना गंभीर अंतर्गत दुखापत किंवा अंतर्गत रक्तस्राव (Internal Bleeding) झालेला असतो. अशा आरोपींना थेट पोलीस ठाण्याच्या कोठडीत न ठेवता तात्काळ वैद्यकीय तपासणी व तातडीच्या उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे. त्यांच्या अंगावरील बाह्य जखमांची सविस्तर नोंद अटक पंचनाम्यात व ठाणे दैनंदिनीत (Station Diary) आरोपीला पोलिसांच्या स्वाधीन करणाऱ्या व्यक्तींच्या नावांसह स्पष्टपणे करावी.

**१.३** महाराष्ट्र राज्य मानव अधिकार आयोग परिपत्रक नं. SHRC ०३/२००२ दि ११/०२/२००२ च्या निर्देशानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने डी. के. बासू विरूद्ध पश्चिम बंगाल (AIR) १९९७ च्या केसच्या अनुषंगाने अटक आरोपी/ स्थानबद्ध आरोपीच्या बाबत ११ महत्वपूर्ण निर्देश दिले असून त्याचे पालन करणे बंधनकारक आहे.

### २. पोलीस ठाण्यांमधील सी.सी.टी.व्ही. (CCTV) यंत्रणेवाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांचा सविस्तर तपशील :-

परमवीर सिंग सैनी विरुद्ध बलजित सिंग व इतर (SLP Cr. No. ३५४३/२०२०) या प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व पोलीस ठाणे आणि तपास यंत्रणा यामध्ये होणाऱ्या तपास/चौकशी दरम्यान मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत योग्य त्या उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने देशातील सर्व पोलीस ठाणे आणि तपास यंत्रणा यामध्ये होणाऱ्या तपास/चौकशी दरम्यान छायाचित्रीकरण करणे आवश्यक असल्याचे नमूद करून त्यासाठी प्रत्येक पोलीस ठाणे येथे CCTV कॅमेरे बसविणे आवश्यक असल्याचे मत नोंदविले आहे. त्याप्रमाणे प्रत्येक पोलीस ठाणे येथे संबंधित प्रभारी अधिकारी यांनी CCTV कॅमेरे बसवावेत व त्याचा डेटा जतन करावा.

## २.१ सीसीटीव्ही यंत्रणेची व्याप्ती व तांत्रिक निकष :-

### २.१.१ कॅमे-यांची व्याप्ती :-

पोलीस ठाण्याचे मुख्य प्रवेशद्वार (Entry), सर्व निर्गमन मार्ग (Exit), मुख्य कॉरिडोअर, चौकशी कक्ष (तपास अधिकाऱ्यांची व अंमलदारांची दालने ), लॉकअप (कोठडीचा आतील व बाहेरील भाग ), व त्यातील स्वच्छतागृह, लॉकअप कॉरिडोअर पोलीस ठाण्याचा संपूर्ण बाहेरील परिसर आणि या सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.

### २.१.२ तांत्रिक क्षमता :-

सर्व सीसीटीव्ही यंत्रणेमध्ये नाईट व्हिजन (Night Vision) आणि स्पष्ट ऑडिओ रेकॉर्डिंग (Audio Recording) ची सुविधा असणे अनिवार्य आहे. केवळ व्हिडिओ रेकॉर्डिंग असून चालणार नाही, तर संभाषणाचा आवाजही रेकॉर्ड झाला पाहिजे.

### २.१.३ डेटा स्टोरेज बॅकअप (१८ महिने Storage) :-

मा. न्यायालयाच्या कडक आदेशानुसार सीसीटीव्हीचे फुटेज किमान १८ महिने (१८ Months) साठवून ठेवण्याची (Data Storage Backup) क्षमता असणारी हार्डडिस्क व सर्व्हर यंत्रणा तांत्रिकदृष्ट्या बंधनकारक आहे.

## २.२ जबाबदारी व पर्यवेक्षण समिती (Oversight Committees) :-

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०३/०४/२०१८ रोजी SLP.No. २३०२/२०१७ शफी मोहम्मद विरुध्द हिमाचल प्रदेश (SCC ३११) मध्ये केंद्र सरकारने गुन्ह्याच्या तपास चौकशीमध्ये छायाचित्रण बंधनकारक करण्याच्या दृष्टीने केंद्रीय पर्यवेक्षण समिती व राज्यांमध्ये राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पर्यवेक्षण समिती स्थापन करणेबाबत आदेश दिले होते. त्यानुसार त्यांचेवर राज्यातील सर्व पोलीस ठाणे व इतर तपास यंत्रणांमधील CCTV कॅमेरे बसविण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेरे २४ तास सुस्थितीत चालवणे व त्याचे अखंड रेकॉर्डिंग सुरू ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची (SHO) असेल. यंत्रणेत कोणताही तांत्रिक बिघाड किंवा वीज पुरवठा खंडित झाल्यास, त्याची नोंद स्टेशन डायरीला करून तात्काळ जिल्हास्तरीय समितीकडे (DLOC) दुरुस्तीसाठी रिपोर्ट करावा. कॅमेरे बंद असलेल्या कालावधीत जर एखाद्या आरोपीची चौकशी किंवा अटक झाली असेल, तर तसा विशेष अहवाल तातडीने वरिष्ठ कार्यालयात सादर करावा.

## २.३ पर्यवेक्षण समित्यांची रचना व कर्तव्ये :-

### २.३.१ राज्य पातळीवरील समिती (State Level Oversight Committee-SLOC) :-

यामध्ये गृहविभागाचे सचिव/ सहसचिव, वित्तविभागाचे सचिव/ सहसचिव, पोलीस महासंचालक/ महानिरीक्षक, आणि राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष यांचा समावेश असेल. ही समिती निधी वाटप आणि राज्यभरातील अंमलबजावणीचा आढावा घेईल.

**२.३.२ जिल्हा पातळीवरील समिती (District Level Oversight Committee-DLOC) :-**

यामध्ये विभागीय आयुक्त/महसूल आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक (SP), आणि संबंधित जिल्ह्यातील महापौर/जिल्हा परिषद अध्यक्ष यांचा समावेश असेल. ही समिती प्रत्यक्ष पोलीस ठाण्यांना भेटी देऊन सीसीटीव्ही यंत्रणेची तपासणी करेल व अहवाल सादर करेल.

**२.३.३** एखाद्या पोलीस ठाणे मध्ये आरोपीस मारहाण करून, त्यातून तो गंभीर जखमी / मृत्यू झाला असेल तर भारतीय मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ चे कलम १७, १८ अन्वये तक्रार दाखल करून, कलम ३० अन्वये सदरची तक्रार मानवी हक्क न्यायालयात पाठवावे. त्यानुसार सदरचे कोर्ट संबंधित पोलीस ठाण्याला CCTV फुटेज मागविणेसाठी समन्स पाठवेल आणि सदरचे CCTV फुटेज तपास यंत्रणेला उपलब्ध करून देणे बंधनकारक राहिल.

**३. पोलीस कोठडी मृत्यूचे प्रमाण कमी होण्याकरीता करावयाच्या इतर उपाययोजना :-**

१) मा. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी अटकेबाबतचे मार्गदर्शक तत्वांचे तसेच राष्ट्रीय/ राज्य मानव अधिकार आयोग यांनी दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

२) अटक आवश्यक असल्यास बीएनएसएस, २०२३ Chapter V मधील अटकेबाबतच्या तरतुदींचे तंतोतंत पालन करावे.

३) अटकेचा पंचनामा करताना झालेल्या जखमांचा अथवा नागरिकांनी मारहाण केली असल्यास त्याबाबत सविस्तर नमूद करावे.

४) अटक केलेल्या व पोलीस कोठडी देण्यात आलेल्या आरोपीस दुखापत झाल्याचे आढळल्यास त्यास तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेऊन उच्च प्रतीचे वैद्यकिय सुविधा उपलब्ध करून त्यांच्या जिविताचे व शरीराचे रक्षण करावे. तसेच प्रथमोपचार पेटी अद्ययावत ठेवावी व प्रथमोपचाराबाबतचे प्रशिक्षण सर्वांना द्यावे.

५) तपास पूर्ण झाला असल्यास पोलीस कस्टडी रिमांडची आवश्यकता नसल्यास अटक आरोपीचे रिमांड घेणे शक्यतो टाळावे.

६) आरोपी पोलीस कस्टडी रिमांड मध्ये असेल दर ४८ तासांनी आरोपीची वैद्यकिय तपासणी करावी.

७) अटक आरोपीस तपासाकरीता नेताना लॉकअप रजिस्टर मध्ये नोंदी घ्याव्यात.

८) पोलीस कोठडीच्या बाहेर CCTV यंत्रणा बसवावी व त्यांचा अभिलेख पुढील १८ महिन्यांच्या कालावधीकरिता जतन करण्यात यावा.

९) वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी पोलीस ठाणे भेटी दरम्यान कोठडीस भेट द्यावी व भेटीदरम्यान लॉकअप रजिस्टर, अटक रजिस्टर इत्यादी तपासावे.

१०) जामिनपात्र गुन्ह्यात आरोपीस अटक केल्यानंतर विनाकारण कोठडीत न ठेवता जामिनावर मुक्त करावे.

११) अटक आरोपीची सुरक्षा, आरोग्य व जिविताची जबाबदारी त्यास अटक करणारा अधिकारी, तपास अधिकारी, SHO व त्या पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांची राहिल.

१२) ठाणे दैनंदिनी कक्ष, लॉकअप तसेच गुन्हे प्रकटीकरण कक्ष येथे CCTV कॅमेरे बसवून ते दररोज सुस्थितीत चालू आहेत का नाहीत याची खात्री करावी.

१३) पोलीस कोठडीमध्ये आरोपीतास आत्महत्या / मृत्यूस कारणीभूत ठरणारे साहित्य अथवा कोठडीची रचना असल्यास त्याची पाहणी करून त्यामध्ये आवश्यक तो बदल करावा.

१४) पोलीस कोठडीतील मृत्यू प्रमाण कमी होणेकरीता पोलीस कोठडीतील पहाऱ्याचे सतर्कतेबाबत व कोठडीतील आरोपीची हालचाल पोलीस ठाणेतील सर्वांना दिसणेबाबत पोलीस ठाणेमध्ये ठाणे अंमलदार कक्ष, पोलीस निरीक्षक कक्ष, वायरलेस कक्ष या ठिकाणी CCTV यंत्रणेचे डिस्प्ले बसवावे.

**४. पोलीस कोठडीतील मयत व्यक्तीच्या वारसदारांना आर्थिक सहाय्य :-**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग पत्र क्र. पीसीडी-२०११/प्र.क्र.३/पोल-१४, दि.२८ फेब्रुवारी २०११ अन्वये राज्यातील पोलीसांच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून केला जातो व पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाला असल्याचे निष्कर्ष असल्यास त्याच्या वारसदारांना रू.१ लाख आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच सदर तपासात पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला, असेल तर सदर प्रकरणी मयत व्यक्तीच्या वारसदारांना रू १.५ लाख आर्थिक सहाय्य देण्यात येते. याबाबत मयताच्या वारसदारांस अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२८१६४८४५०८२९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHUBHANGI ASHAY POTE

Digitally signed by SHUBHANGI ASHAY POTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=D3D1EF889C3B61818AB5B80CDD80ADB67987D7B4D67FDD30609196E3C42A626A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A3686057BA04185ADDB654EDEC4DE91E5E9AA1E243BAE1702175810F69A3E15, cn=SHUBHANGI ASHAY POTE
Date: 2026.07.28 16:50:14 +05'30'

**( शुभांगी पोटे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पूणे
३. अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक
५. सर्व पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक

**प्रत माहितीसाठी :-**

१. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, मुंबई
२. महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद यांचे सर्व सदस्य
३. मा. राज्यपालांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
६. राष्ट्रीय मानव हक्क आयोग, मानव अधिकार भवन, ब्लॉक सी, जीपीओ कॉम्प्लेक्स, आयएनए नवी दिल्ली - ११००२३

७. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई
८. मा. अध्यक्ष, राज्य महिला आयोग
९. सर्व जिल्हा परिषद अध्यक्ष
१०. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
११. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४. सर्व विभागीय आयुक्त
१५. सर्व जिल्हाधिकारी
१६. निवड नस्ती, पोल-१४, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.